**<u>नियमीत दिवाणी दावा क्रं. ५९/१९९२ मधील नि. १५० खाली आदेश</u>**

प्रस्तुत दावा वादीने प्रतिवादीविरुध्द ठराव व ताकिदीसाठी दाखल केला आहे.

**०२.** सदर दाव्यातील सदर दाव्यामध्ये वादीचे पूर्वीचे वकील यांनी अचानक वकीपत्र रद्द केलेमुळे मे. न्यायालयाने सदर दाव्यातील सर्व वादींना समज पाठविलेली होती. वादी मे. न्यायालयासमोर स्वतः हजर झालेनंतर वादी यांना समजले की, प्रतिवादी क्र. ३ हे दि. २७/१२/१९९१ रोजी मयत झालेबाबत वादीने पूर्वीचे वकीलांना त्यावेळी कळवले होते परंतु प्रतिवादी क्र. ३ यांचे मृत्युनंतर त्यांचे वारस रेकॉर्डवर घेण्याचे राहून गेले आहे. सदर प्रतिवादी क्र. ३ चे वारस रेकॉर्डवर घेणे गरजेचे आहे. सबब, सदर प्रतिवादी क्र. ३ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यात यावे अशी विनंती वादी यांनी केली आहे.

**०३.** सदर अर्जावर मागील बाजुस प्रतिवादीने म्हणणे दाखल केले आहे. प्रतिवादीने असे नमुद केले आहे की, विलंब माफीचा अर्ज प्रलंबित आहे. त्याप्रमाणे योग्य तो हुकूम करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**०४.** वादी यांचा अबेटमेंट सेट असाईड (नि.क्र.१४६) चा अर्ज व विलंब माफी अर्ज (नि.१४८) मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे अर्जाच्या अंतिम निर्णयाच्या कामी सुलभता येण्यासाठी व वादी व प्रतिवादी यांच्यातील वाद अंतिमरित्या संपुष्टात येण्याच्या दृष्टीने हा अर्ज मंजूर करणे उचित होईल. त्यामुळे वरील सर्व कारणांचा एकत्र विचार करुन खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात आला.

२. मुळ दाव्याच्या अनुषंगाने प्रतिवादी क्र. ३ च्या वारसा बाबत पुढील तारखेस न चुकता दुरुस्ती करावी.

NEHA K NAGARGOJE
Digitally signed by NEHA K NAGARGOJE
Date: 2024.07.06 11:30:40 +0530

दि.२९.०६.२०२४.
भोर

(एन.के.नागरगोजे)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
भोर

**CERTIFICATE**

"I affirm that the contents of this P.D.F file Order are same word for word as per original Order

| | | |
|---|---|---|
| Name of the Steno | – | Smt. S.A.Sonawane |
| Court Name | – | Hon'ble Smt. N.K.Nagargoje |
| Date of Order/Judgment | – | 29/06/2024 |
| Date of Sign Order/Judgment | – | 05/07/2024 |
| Order uploaded on | – | 06/07/2024 |